Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

## NOTICE

नो.क्र. ४४.

दिनांक : / /२०१९ 13 JUL 2019

## एम.कॉम भाग १ प्रवेश प्रक्रियेबाबत महत्वाची सूचना

शैक्षणिक वर्ष २०१९–२०२० मधील एम.कॉम. भाग १ मध्ये प्रवेश घेण्यास इच्छुक असणा–या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की ज्या विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अद्याप घेतलेले नसतील अशा विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश दि. १८/०७/२०१९ पर्यंत घ्यावेत. यासाठी विद्यार्थ्यांनी **www.tccollege.org** या संकेतस्थळावर फॉर्म भरावा व दिलेल्या खालील नियमांचे तंतोतंत पालन करावे.

1) विद्यार्थ्यांनी विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार मधून माहितीपत्रक घ्यावे माहितीपत्रकावर ऑनलाईन प्रवेशासाठीचे युजरनेम व पासवर्ड दिलेले आहेत. त्यातील सदर युजरनेम व पासवर्ड विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी वापरावेत तसेच ते गोपनीय ठेवावेत.
2) सदर ऑनलाईन प्रवेश अर्जाची पाठपोट प्रिंटआऊट घेवून त्यासोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून महाविद्यालयात 'प्रशासन भवन' येथून तपासून घ्यावीत व त्यानुसार असणारी प्रवेश फी महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर जाऊन डेबिटकार्ड/क्रेडीटकार्ड तर्फे ऑनलाईन भरावी. भरलेल्या चलनाची एक प्रत 'प्रशासन भवन' येथे जमा करावी.
3) प्रवेश घेताना एम.कॉम. भाग १ मधील विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जावर संबंधित विभाग प्रमुखांची व उपप्राचार्य डॉ.एस.जे.साठे यांची सही घ्यावी.
4) ज्या विद्यार्थ्यांचे बॅंकेत खाते नसेल अशा सर्व विद्यार्थ्यांनी बॅंकेत तातडीन खाते उघडावे.
5) विद्यार्थ्यांनी प्रवेश फी भरल्यानंतर लगेचच आपले ओळखपत्र तयार करुन घ्यावे.
6) विद्यार्थ्यांनी आधार कार्डची झेरॉक्स प्रत सोबत जोडावी. ज्यांनी अद्यापही आधार कार्ड काढले नसेल त्यांनी त्वरीत आधार कार्ड काढून त्याची झेरॉक्स प्रत कार्यालयात आणून द्यावी.
7) बॅंकेमध्ये फी भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी चलनाची प्रत 'प्रशासन भवन' येथे जमा करावी.

# –प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे –

1) प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना पदवी अभ्यासक्रमाची अंतिम परीक्षेचे गुणपत्रक व झेरॉक्स प्रत, मूळ गुणपत्रकावरुन तपासून मूळ गुणपत्रक परत केले जाईल.

2) अन्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी टी.सी व मायग्रेशन जोडणे आवश्यक आहे. परंतु टी.सी. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जर टी.सी. घेतला असेल तर जोडावा. अन्यथा टी.सी. जोडण्याची आवश्यकता नाही.

3) मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत जोडावी.

4) ई.बी.सी. सवलत घेणा–या विद्यार्थ्यांनी ई.बी.सीचे ऑनलाईन फॉर्म सुरु झाल्यानंतर ताबडतोब भरावेत.

5) अलिकडच्या काळात काढलेले आयडेंटीटी कार्ड साईजचे 2 फोटो.

6) राष्ट्रीयकृत बॅकेच्या खाते नंबरची झेरॉक्स प्रत.

7) (प्रवेशासाठीच्या अधिक माहितीसाठी विभागप्रमुखांशी संपर्क साधावा)

■ **विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी सेवा विनामूल्य उपलब्ध आहे तरी, सर्वांनी या संधीचा लाभ घ्यावा.**

**तरी, विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत प्रवेश घेवून तसेच आपले ओळखपत्र तयार करुन घेवून प्रशासनास सहकार्य करावे. तसेच जे विद्यार्थी दिलेल्या मुदतीत प्रवेश घेणार नाहीत त्यांचा प्रवेश हक्क रद्द होईल. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

रजिस्ट्रार | उपप्राचार्य | प्राचार्य